राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व राज्याची रोजगार हमी योजना यांची सांगड घालून सर्वंकष रोजगार हमी योजना (महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना) राबविणे.

महाराष्ट्र शासन

शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक : रोहयो-२००५/प्र.क्र.१०४/रोहयो-१०

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २३ डिसेंबर २००५

**प्रस्तावना :**

दिनांक २३ ऑगस्ट २००५ रोजी लोकसभेने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंमलात आणण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी विधेयक, २००५ पारित केले आहे. त्यास दिनांक ५ सप्टेंबर २००५ रोजी राष्ट्रपतींनी मंजूरी दिली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्रात कशा प्रकारे करावी व सध्या महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या रोजगार हमी योजनेची ह्या राष्ट्रीय योजनेशी कशी सांगड घालावी हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर शासनाने विचार केला असून आता शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ व राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ या दोन्ही कायद्यातील विसंगती दूर करुन व दोन्हीतील अधिक चांगल्या व आवश्यक बाबी घेऊन राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाच्या कलम ४ व २८ अन्वये एक सर्वंकष रोजगार हमी योजना **(महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना)** राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अंमलात आणण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे मजूरांना सध्याच्या रोहयोखालील अधिकच्या सोयी-सवलती मिळत राहतील व रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल.

२. पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील १२ जिल्हयांची निवड करण्यात आली आहे. ते जिल्हे म्हणजे धुळे, नंदूरबार, अहमदनगर, औरंगाबाद, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, अमरावती, गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, व गडचिरोली.

३. भविष्यकाळात केंद्रशासन आणखी ज्या जिल्हयात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा राबविण्याचे आदेश काढील त्या जिल्हयात सुध्दा सदर महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंमलात येईल.

४. उपरोक्त १२ जिल्हे, मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळता इतर जिल्हयात व संपूर्ण राज्यातील 'क' वर्ग नगर परिषद हद्दीत सुध्दा हीच योजना काही बाबतीत महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ प्रमाणे राबविण्यात येईल. मात्र तेथे सुध्दा केंद्रशासनाच्या कायद्याप्रमाणे सर्व इच्छूक कुटूंबांना जॉब कार्ड व ओळखपत्र इ. देण्यात येतील. याविषयी सविस्तर सूचना स्वतंत्रपणे देण्यात येत आहेत.

५. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची वैशिष्टये थोडक्यात पुढीलप्रमाणे असतील :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ च्या कलम २ (जी) प्रमाणे कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून शासकीय यंत्रणांशिवाय जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, अशासकीय संस्था, स्थानिक संस्था किंवा शासनाचे उपक्रम यांना नियुक्त करण्यात येईल.

(२) कलम ६ (१) प्रमाणे केंद्रशासन ठरवील त्यानुसार किमान मजुरी दर लागू होईल.

(३) कलम ७ (२) प्रमाणे बेरोजगार भत्ता देण्यात येईल. म्हणजेच, पहिल्या ३० दिवसांपर्यंत किमान वेतनाच्या २५ टक्के व नंतर ५० टक्के दराने बेरोजगार भत्ता देण्यात येईल.

(४) कलम १२ प्रमाणे महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद स्थापन करण्यात येईल.

(५) कलम १३ प्रमाणे ग्रामपंचायतीचा नियोजनात सहभाग राहील.

(६) कलम १६ प्रमाणे ग्रामपंचायतीवर योजनेच्या विविध जबाबदा-या सोपविण्यात येतील.

(७) कलम १० प्रमाणे कामाच्या निवडीत ग्रामसभेचा सहभाग घेण्यात येईल.

(८) कलम १८ प्रमाणे जिल्हाधिकारी हे जिल्हा कार्यक्रम समन्वयन अधिकारी राहतील.

(९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सह जिल्हा कार्यक्रम समन्वय अधिकारी राहतील.

(१०) कलम १५ प्रमाणे पंचायत स्तरावर गट कार्यक्रम अधिकारी नियुक्त करण्यात येतील. ते उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतील.

(११) गट कार्यक्रम अधिकारी यांना तांत्रिक व अतांत्रिक आस्थापना उपलब्ध करुन देण्यात येईल.

(१२) कलम २३ प्रमाणे योजनेत पारदर्शकता आणण्यात येईल.

(१३) इतर सर्व बाबी राज्याच्या रोहयोप्रमाणे राहतील.

६. १०० दिवसांपर्यंतच्या रोजगाराच्या हमीच्या खर्चासाठी स्वतंत्र हिशोब ठेवावा, जेणेकरुन केंद्रशासनाकडून आर्थिक सहाय्य प्राप्त करुन घेणे सोयीचे जाईल. हा हिशोब नीट ठेवता यावा म्हणून प्रत्येक कामावरील पंधरवडयाचे मस्टर बंद झाल्यावर व मजूरांना त्यांचे वेतन दिल्यानंतर त्या मस्टरची एक अतिरिक्त प्रत गट कार्यक्रम अधिका-याकडे तात्काळ पाठविण्यात येईल. त्यावरुन प्रत्येक कुटूंबातील व्यक्तींची नावे, त्यांच्या जॉब कार्डवरील क्रमांक, त्यांनी काम केलेल्या दिवसांची संख्या व त्यांना मिळालेले वेतन यांचा डाटा संकलित करुन त्यानुसार केंद्रशासनाकडून वेतनावरील (कुशल, अर्धकुशल व अकुशल) देय असलेली रक्कम निश्चित करण्यात यावी. यासाठी तातडीने संगणकीकरण करण्यात यावे.

७. १०० दिवसांपेक्षा अतिरिक्त रोजगार देण्याची जबाबदारी राज्याच्या रोहयो निधीमधून पूर्ण करावी.

८. सदर योजनेकरिता जिल्हाधिकारी हे कार्यक्रम समन्वय अधिकारी असतील व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सह जिल्हा कार्यक्रम समन्वय अधिकारी राहतील.

९. गट कार्यक्रम अधिका-यांची आवश्यक ती पदे केंद्रशासनाने निवडलेल्या जिल्हयातील गटांसाठी पदे निर्माण करुन ती कंत्राटी पध्दतीने भरावीत. ते उप विभागीय अधिकारी (महसूल) यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतील. पदे भरेपर्यंत तहसिलदार यांच्याकडे हे काम सोपविण्यात यावे.

१०. जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिलदार कार्यालयासाठी सध्याच्या महाराष्ट्राच्या रोहयोसाठी जी यंत्रणा आहे ती या योजनेसाठी वापरण्यात यावी.

११. आवश्यक तेथे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्यानुसार व केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी, जेणेकरुन केंद्राचे आर्थिक सहाय्य मिळण्यात अडचण येणार नाही.

१२. महाराष्ट्र ग्रामीण रोहयोखाली पुढीलप्रमाणे कामे घेता येतील:-

(१) जलसंधारण व जलसंवर्धन कामे :- मातीचे बांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, वनराई बंधारा, जैविक बांध, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम माऊंड, सामुहिक शेत तळे, मातीचे धरण, साठवण तलाव, पाझर तलाव, पाझर कालवे, गाव तलाव, भूमिगत बंधारे, वन तलाव, बोडी नूतनीकरण.

(२) दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहित) :- पडीक जमिनीवर वृक्ष लागवड, रस्त्याच्या बाजूला वृक्ष लागवड, रोप वाटिका, वृक्ष लागवड,जाळ रेषांची कामे, बांबू रांझ्या भोवती वर्तुळाकार चर काढणे, वृक्ष लागवड.

(३) जलसिंचन कालव्यांची कामे (लघु व सूक्ष्म जलसिंचनाची कामे) :- मातीचे कालवे, कालव्याचे नूतनीकरण.

(४) अनुसूचित जाती /जमाती, नवीन भूधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे.

(५) पारंपरिक पाणीसाठ्यांचे योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे :- तलावातील गाळ काढणे. जुन्या तलावाचे नूतनीकरण करणे व जुन्या वन तलावाचे नूतनीकरण करणे.

(६) भूविकासाची कामे.

(७) पूरनियंत्रण व पूरसंरक्षकाची कामे. पाणथळ क्षेत्रात चा-याची कामे - खार जमीन विकास बंधारे.

(८) ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे :- इतर जिल्हा रस्ते, गांव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, शेत रस्ते, स्मशान भूमी व पाणी पुरवठा इत्यादींना जोडणारे रस्ते, रस्त्यांचे नूतनीकरण, रस्त्यांचे रुंदीकरण.

१३. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली वैयक्तिक लाभाची कामे (म्हणजे जवाहर विहिरी, खाजगी जमिनीवर फलोत्पादन, वृक्ष लागवड, तूती लागवड इत्यादि कामे) अनुज्ञेय नाहीत. म्हणून ही कामे यापुढेही राज्यशासनाच्या रोहयो निधीतून घेण्यात येतील.

१४. महाराष्ट्र ग्रामीण रोहयोकरिता कामांचे नियोजन करण्यास काहीसा वेळ लागेल. तोपर्यंत सुरुवातीला संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना व कामासाठी धान्य राष्ट्रीय कार्यक्रम (NFFWP) यासाठी तयार करण्यात आलेले अनुक्रमे वार्षिक व यथार्थदर्शी नियोजन या योजनेचा कृति आराखडा म्हणून वापरण्यात यावा. अमरावती जिल्ह्याने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ प्रमाणे कामाचे नियोजन करण्याची तयारी सुरु करावी व तोपर्यंत राज्याच्या रोहयोचा वार्षिक आराखडा महाराष्ट्र ग्रामीण रोहयोसाठी वापरावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रमेशचंद्र कानडे

( रमेशचंद्र कानडे )

प्रधान सचिव (रोहयो)

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री
३) मा.उप मुख्यमंत्री
४) सर्व मंत्री
५) सर्व राज्यमंत्री
६) मुख्य सचिव
७) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
८) सर्व विभागीय आयुक्त
९) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१२) उप विभागीय अधिकारी (महसूल) (सर्व)
१३) तहसिलदार (सर्व )
१४) गट विकास अधिकारी (सर्व)
१५) सर्व मंत्रालयीन विभाग
१६) निवड नस्ती.